# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २०८** **दिनांक :- ३१/०७/२०२१**

## गावठी हातभट्टीच्या दारुची वाहतूक करणा-यांवर वालीव पोलीस स्टेशनची कारवाई.

दिनांक ३०/७/२०२१ रोजी पोलीस उपनिरीक्षक श्री. एल. बी. बोरा नेमणुक- वालीव पोलीस ठाणे, हे गुन्हयाचे तपासकामी त्यांचे दुचाकीवरुन जात असताना त्यांना दोन इसम नंबर प्लेट नसलेल्या पल्सर मोटार सायकलवरुन रबरी टयुब व नायलॉनचे गोणी मधून काहितरी संशईतरित्या वाहतूक करित असल्याचे दिसल्याने त्यांनी सदर मोटारसायकलचा पाठलाग करून सदर दोन इसमांचे ताब्यातील रबरी टयुब व नायलॉनचे गोणीची पाहणी केली असता त्यांना त्यामध्ये गावठी बनावटीची दारू दिसुन आल्याने पोउपनी बोरा यांनी गस्तिवरील बीट मार्शल पो. शि. शेंडगे व पो.शि. पाटील यांना बोलावून घेवून त्यांचे मदतीने सदरील इसमांचे ताब्यातील मोटारसायकल, दोन रबरी टयुब व दोन नायलॉनचे गोणी मध्ये ९८ लिटर गावठी हातभट्टीची तयार दारु ताब्यात घेतली. सदर बाबत वालीव पोलीस ठाण्यात अवैद्य गावठी हातभट्टीची दारुची वाहतूक बाबत गुन्हा दाखल करणेत आला आहे. सदर गुन्हयाचे कामी पल्सर मोटार सायकल, ९८ लिटर अवैद्य गावठी हातभट्टीची दारु असा एकूण ७४,८००/- रु.किं. चा प्रोव्हीबिशन गुन्हयाचा माल जप्त करणेत आला आहे.

सदरची कामगिरी श्री. कैलास बर्वे, प्रभारी अधिकारी, वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पो.निरी., पोउपनि. एल. बी. बोरा, पोशि. शेडगे व पोशि अशोक पाटील यांनी केली आहे.

----oooo----